

| वर्ष - 7 । अंक - 305 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 24 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- पंजाबचा दिल्लीवर दणदणीत विजय!
- कंगना अडकणार लग्नबंधनात?
- तुरुंगातून टोळ्या चालवल्या जातात
- प्रकाश आंबेडकरांनी दिला अल्टिमेटम!

## विद्यार्थ्याचे वय, त्याची आवड लक्षात घेत पुस्तकांची यादी

# क्लासरुम लायब्ररीतून वाचण्याची गोडी!

## » महापालिकेच्या 50 शाळांमध्ये उपक्रम : 1 लाख 38 हजाराहून अधिक पुस्तकं


। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची रुची वाढवण्यासाठी क्लासरुम लायब्ररी सुरु करण्यात आली असून या लायब्ररीला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळतोय. महापालिकेच्या ५० प्राथमिक शाळांत १ लाख ३८ हजार ६५५ विविध भाषांतील पुस्तके वाचनाचा विद्यार्थी आनंद घेत आहेत.**



लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची अभिरुची निर्माण करण्याच्या उद्देशाने अभ्यासाच्या पुस्तकांव्यतिरीक्त अवांतर वाचनासाठी क्लासरुम लायब्ररी उपक्रम सुरु केला आहे. या माध्यमातून मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दु भाषांतील पुस्तकांचा यात समावेश आहे. विद्यार्थ्याचे वय, त्याची आवड लक्षात घेत पुस्तकांची यादी करण्यात आली आहे. यामध्ये नामांकित संस्था प्रथम, तुलिका, नॅशनल बुक ट्रस्ट यांच्या मार्गदर्शनानुसार त्यांनी सुचवलेल्या पुस्तकांचा यात समावेश करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना आवडतील अशा विविध विषयांवर आधारित पुस्तके यात असल्याने विद्यार्थ्यांना वेगवेगळी पुस्तके वाचता येतात.

पुस्तके विद्यार्थ्यांकडेच सोपवली असल्याने विद्यार्थी अगदी सक्रीय सहभागी झाले आहेत. पुस्तकांच्या कपाटाची चावी विद्यार्थ्यांकडे सोपवल्यामुळे विद्यार्थी देखील प्रामाणिकपणे पुस्तकांची हाताळणी करत आहेत. तसेच प्रत्येक शाळेत २ विद्यार्थी प्रतिनिधी असल्यामुळे विद्यार्थ्यांमधील नेतृत्वगुण वाढवण्याचा यातून प्रयत्न आहे. एकमेकांना हवी ती पुस्तके देत विद्यार्थी प्रतिनिधी देखील समन्वय साधत आहेत.



### लायब्ररी चॅम्पियन म्हणून शिक्षकांची निवड ...

» हा उपक्रम राबवता यावा यासाठी महापालिकेने प्रत्येक शिक्षक हा लायब्ररी चॅम्पियन म्हणून निवडला आहे. तसेच प्रत्येक शाळांतील २ विद्यार्थ्यांची निवड केली आहे. या तीन जणांच्या माध्यमातून हा उपक्रम प्रत्येक शाळेत राबवला जातो. यासाठी प्रशिक्षण दिले जात असून त्याप्रमाणे हा उपक्रम राबवला जात आहे. तसेच पुस्तकांसाठी खास कपाट बनवण्यात आली असून या ६७७ कपाटांमध्ये पुस्तके ठेवण्यात आली आहे. प्रत्येक इयत्तेनुसार विद्यार्थ्यांची आवड पाहता विषय आणि आशयाची निवड असलेली पुस्तके निवडण्यात आली आहेत.

# गरवारे कंपनीबाहेर ट्रकच्या धडकेत महिलेचा मृत्यू!

## » वाहतूक सुरक्षेचा प्रश्न : मटेरिअल गेट बंद करण्याची गरज

। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**थरमॅक्स चौक ते आकुर्डी रस्त्यावर गरवारे टेक्निकल फायबर नावाची कंपनी आहे. या रस्त्यावर नेहमी वर्दळ असते आणि याच रस्त्यावर कंपनीचे मटेरियल गेट आहे. गेट समोर कंपनीमध्ये आलेल्या एका ट्रकच्या धडकेने महिलेचा जागेवरती मृत्यू झाला आहे. ही घटना आज शनिवार दिनांक २३ मार्च रोजी दुपारी १२ च्या दरम्यान झाली. त्यानंतर तिला वायसीएम रुग्णालयात रिक्षाने हलवण्यात आले, मात्र तिला मृत घोषित केले.**



वंदना सुरेश भोसले वय 51 वर्षे राहणार अजंठा नगर असे मृत महिलेचे नाव आहे. सदरची महिला कामानिमित्त रस्त्याने पायी चालत जात होती. याचवेळी कंपनीमध्ये साहित्य घेऊन येणारा ट्रक याने डावीकडील बाजूने महिलेला धडक दिली. कंपनीत आलेला आयशर ट्रक क्रमांक DD 03 R 9486 याने महिलेला कंपनीत प्रवेश करताना धडक दिली. ही घटना कंपनीच्या सुरक्षारक्षकांनी प्रत्यक्ष दर्शनी सांगितले. घटनेनंतर उशिरा रात्री ८:४० वाजता निगडी पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली.

यावेळी कंपनीच्या सुरक्षा वरीष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क केला असता त्यांनी आमचे सुरक्षा रक्षक वाहने आत बाहेर काढताना लक्ष देत असतात असे सांगितले. तसेच कंपनीत असणारी रुग्णवाहिका सदर महिलेला दवाखान्यात नेण्यासाठी वापरता आली नाही. कंपनीचे नियमाप्रमाणे कंपनीमधील कामगारांनाच अपघात समयी रुग्णवाहिकेचा वापर करण्यात येतो असे सांगितले. मात्र, या सर्व घटनेतून कंपनीच्या सुरक्षा विभागाचा व कंपनीमध्ये येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कंपनीकडून कोणतीही सुविधा पुरविण्यात येत नसल्याचे दिसून आले. वंदना सुरेश भोसले या महिलेच्या नोकरीवरतीच घराचा उदरनिर्वाह होत होता. तिच्या पाठीमागे दोन लहान मुले व एक मतिमंद मुलगा आहे. त्यामुळे घरचा कमावता व्यक्ती मृत पावल्याने भोसले यांचा कुटुंब उघड्यावरती पडणार आहे. त्यामुळे या महिलेच्या कुटुंबासाठी गरवारे कंपनी यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून मदत करणे गरजेचे आहे.

### मुख्य रस्त्यावरील कंपनीचे मटेरियल गेट बंद करावे....

» कंपनीतून उत्पादित होणारा माल व कच्चा माल याचा करण्यासाठी दररोज अनेक ट्रक कंपनी बाहेर उभे असतात. मुख्य रस्त्यावर लांबच्या लांब रांगा लावून वाहने उभे असल्याने वाहन चालकांना याचा नेहमी त्रास होतो. कंपनीमध्ये अनेक ट्रक रस्त्यावरतीच अनधिकृतपणे पार्किंग करत असतात. कंपनीतून रस्त्यावरती येणारा ट्रक आत बाहेर करताना कोणताही सुरक्षा रक्षक कंपनी कडून पुरवण्यात येत नाही. त्यामुळे मुख्य रस्त्यावरील कंपनीचे गेट तात्काळ बंद करून अंतर्गत रस्त्याच्या मार्गाने सुरू करावे अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# ‘पुणे लोकसभेच्या आखाड्यात हजारो मल्ल ठोकणार शड्डू’!

# मुरलीधर मोहोळांचा घरोघरी जाऊन करणार प्रचार!

## मोहोळ मूळचे पैलवान असल्याने विजयासाठी सरसावले मल्ल

। पुणे । महाईन्यूज ।
विशेष प्रतिनिधी।

**मूळचे पैलवान असलेले आणि आता भाजपा महायुतीकडून पुणे लोकसभेच्या आखाड्यात उतरलेले पै. मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारासाठी हजारो मल्ल पुण्यात शड्डू ठोकणार आहेत. आपल्यातीलच एका पैलवानाला थेट लोकसभेसाठी संधी मिळाल्याने विजयासाठी झोकून देऊन काम करण्याचा निर्धार यावेळी पुणे आणि परिसरातील मल्लांनी एकदिलाने करण्यात आला.**



पै. मोहोळ यांचे मताधिक्य वाढवण्यासाठी घर ना घर पिंजून काढून असाही निश्चय करत यासाठी कृती आराखडाही तयार करण्यात आला आहे.पैलवानकीचा सराव करत असताना मोहोळ यांनी कोल्हापूर आणि पुणे परिसरात पैलवानांचा मोठा मित्र परिवार तयार केला होता. आज मोहोळ स्वतः लोकसभेच्या आखाड्यात उतरल्याने

पुणे आणि परिसरातील मल्लही मोहोळ यांच्या प्रचारासाठी एकवटले असून पुढील प्रचारासाठी प्लॅन तयार करण्यात आला आहे. त्यात पुढील ४५ दिवसांचे नियोजन करण्यात आले आहे. कर्वे रस्त्यावरील अंबर हॉल येथे झालेल्या बैठकीत महाराष्ट्र केसरी, हिंदकेसरी, विविध तालमींचे वस्ताद, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू आवर्जून उपस्थित होते. पै. दीपक मानकर, पै. बापूसाहेब पठारे, पै. विकास दांगट, पै. आप्पा रेणूसे, पै. शुक्राचार्य वांजळे, पै. बाबा कंधारे, पै. हनुमंत गावडे, पै. योगेश दोडके, पै. संदीप भोंडवे, पै. विलास कथुरे, पै. ज्ञानेश्वर मांगडे, पै. विजय बनकर, पै. शिवराज राक्षे, पै. राजेश बारगुजे, पै. संतोष गरुड, पै. नितीन दांगट, पै. रामभाऊ सासवडे, पै. पंकज हरपुडे, पै. महेश मोहोळ, पै. राजू मोहोळ, पै. तात्या भिंताडे, पै. अभिजीत आंधळकर, पै. विजय जाधव, पै. अमोल बराटे, पै. शिवाजी तांगडे यांच्यासह पुणे आणि परिसरातील पैलवान मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाराष्ट्र केसरी विकी बनकर म्हणाले, आमच्या पैलवानांपैकी एक पैलवान थेट दिल्लीत जाणार आहे. ही आम्हा सर्वांसाठीच मोठी समाधानाची बाब आहे. म्हणून मोहोळ यांच्या विजयात आपलाही वाटा असावा अशी प्रत्येक पैलवानाची भावना आहे. म्हणूनच आम्ही एकवटलो आहोत. आम्ही एकत्रित येत जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी नियोजन करत असून यात हजारो पैलवान सहभागी होत आहेत. मोहोळ यांचे मताधिक्य वाढवणे ही आता आमची जबाबदारी आहे आणि ती आम्ही यसस्वीपणे पार पाडू, हा विश्वास आहे’. हिंद केसरी पै. योगेश दोडके म्हणाले, ‘मोहोळ यांना मिळालेली उमेदवारी ही आम्हा सर्व पैलवानांचा सन्मान आहे. ते लोकसभेत गेल्यावर आम्हा पैलवानांचे प्रश्न पोटतिडकीने मांडतील आणि ते सोडवण्यासाठी प्रामाणिक पाठपुरावा करतील, हा विश्वास आहे. म्हणूनच आम्ही सर्वांनी मोहोळ यांच्या पाठिशी ठामपणे उभे राहण्याचा निर्णय घेतला आहे’.

मुरलीधर मोहोळ म्हणाले, ‘लाल मातीशी नाते असणारा माझा परिवार एकवटला असून सर्वजण त्यांच्या पातळीवर प्रचारासाठी सज्ज होत आहेत. येत्या कालावधी ८ ते ९ हजार पैलवान स्वयंस्फूर्तीने प्रचारात सहभागी होणार आहेत. विशेष म्हणजे माझा सर्व पैलवान परिवार माझ्या उमेदवारीच्या निमित्ताने एकत्र आला आहे, ही निश्चितच आनंदाची बाब आहे. पै. अप्पा रेणुसे म्हणाले, ‘पुण्यासारख्या शहराचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या पैलनावाला थेट संसदेत जाण्याची संधी मिळत आहे.

### प्रचारासाठी प्लॅन तयार

» पुढील कालावधीत जबाबदारीने घरोघरी प्रचार केल्यास मोहोळ यांना मोठे मताधिक्य मिळेल’. पै. दिपक मानकर म्हणाले, ‘मोहोळ यांच्या मागे पैलवानांची ताकद उभी राहिल्याने त्यांचे मताधिक्य विक्रमी असेल हा विश्वास आहे. आम्ही सर्वजण विश्वासाने एकत्र आलो असून ही निवडणूक मुरलीधर मोहोळ यांची नाही तर ही निवडणूक दीपक मानकर यांची आहे.. पैलवानकीचा सराव करत असताना मोहोळ यांनी कोल्हापूर आणि पुणे परिसरात पैलवानांचा मोठा मित्र परिवार तयार केला होता. पुणे आणि परिसरातील मल्लही मोहोळ यांच्या प्रचारासाठी एकवटले असून पुढील प्रचारासाठी प्लॅन तयार करण्यात आला आहे. भाजपा महायुतीकडून पुणे लोकसभेच्या आखाड्यात उतरलेले पै. मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारासाठी हजारो मल्ल पुण्यात शड्डू ठोकणार आहेत. आपल्यातीलच एका पैलवानाला थेट लोकसभेसाठी संधी मिळाल्याने विजयासाठी झोकून देऊन काम करण्याचा निर्धार यावेळी पुणे आणि परिसरातील मल्लांनी एकदिलाने करण्यात आला.

# पुण्यात रवींद्र धंगेकरांच्या उमेदवारीला विरोध

## काँग्रेसच्या निष्ठावंतांना सातत्यानं डावललं : आबा बागुल

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीकरिता महायुतीकडून माजी महापौर मुरलीधर मोहोळ, तर महाविकास आघाडीकडून आमदार रवींद्र धंगेकर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.**




पण आता महाविकास आघाडीमधील काँग्रेस पक्षात नाराजीनाट्य पाहण्यास मिळत असून पुणे शहरातील काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी उपमहापौर आबा बागूल यांना पुणे लोकसभेची उमेदवारी डावलल्याने, त्यांनी कार्यकर्त्यांसह शिवाजीनगर येथील काँग्रेस भवन येथील कार्यालयाच्या पटांगणात मूक आंदोलन केले. तर मेणबत्त्या पेटवून निषेध देखील नोंदविला. “पुण्यात निष्ठेची हत्या, निष्ठावंताना न्याय नाही... त्यांच्या विचारांना स्थान नाही” अशा आशयाचे फलक आंदोलनकर्ते हाती घेऊन सहभागी झाले होते. या ठिय्या आंदोलनामधून रवींद्र धंगेकर यांच्या उमेदवारीला आबा बागूल यांनी विरोध दर्शविला आहे.यावेळी आबा बागूल म्हणाले की, शहर आणि राज्यपातळीवर काँग्रेसच्या निष्ठावंतांना सातत्याने डावलले जात आहे. या होणाऱ्या अन्यायाविरोधात पुणे शहरातून राज्याच्या विविध भागात निष्ठावंताची न्याय संघर्ष यात्रा काढण्यात येणार आहे. त्यातून ज्यांच्यावर अन्याय झाला आहे.

### निष्ठावंतना डावलले गेल्याची खंत

» प्रत्येक पदाला न्याय देण्याचे काम केले आहे. नगरसेवक, शहराचे उपमहापौर पद देखील भूषविले आहे. त्या माध्यमातून प्रभाग आणि मतदारसंघात काम केले आहे. पण काही काळापूर्वी आलेल्या व्यक्तीला उमेदवारी दिली जाते. पण निष्ठावंतना डावलले गेल्याची खंत मनामध्ये आहे, असे सांगत अप्रत्यक्षपणे रवींद्र धंगेकर यांच्या उमेदवारीला बागुल यांनी विरोध दर्शविला आहे. आता काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते मंडळी आबा बागूल यांची समजूत कशी काढतात याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

# कर्जतमधील शिवसैनिकांचा संकल्प

# “आम्ही सारे, संजोग वाघेरे” म्हणूनच लढणार!

## गावागावांत मतदारांपर्यंत पोहोचू; निवडणूक प्रचारात वाघेरेंची आघाडी

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कर्जत येथील सर्व प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्त्यांची आढावा बैठक पक्षाचे मावळ लोकसभा संघटक आणि उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या उपस्थितीत पार पडली. या बैठकीत मतदारसंघातील महत्वाच्या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली. तसेच उद्धव ठाकरे साहेबांचा संदेश घरोघरी पोहोचविण्याची जबाबदारी आमची असून “आम्ही सारे, संजोग वाघेरे” म्हणूनच मतदारांपर्यंत पोहोचू, असा संकल्प उपस्थित शिवसैनिकांनी केला.**




खोपोलीतील शहर शिवसेना जनसंपर्क कार्यालयात झालेल्या या बैठकीला शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या महिला संघटिका सुवर्णा जोशी, उपजिल्हा प्रमुख नितीन सावंत, खालापूर तालुकाप्रमुख पिगळे, उत्तम कोळंबे, तालुका संघटक बाबू घारे, तालुका सांघटिका करुणा बडेकर, संपर्कप्रमुख सुमनताई लोगले, उपतालुका संघटिका संगीताताई खाडे, विधानसभा युवा अधिकारी संपत हडप, तालुका अधिकारी प्रथमेश मोरे, माजी सभापती पंढरी राऊत, कर्जतचे माजी सभापती प्रदीप ठाकरे, उपतालुका प्रमुख प्रमोद सुर्वे, बाजीराव दळवी, नितीन घुळे, सुरेश गोमारे, शहरप्रमुख निलेश घरत, खालापुरचे ज्येष्ठ नेते उत्तम भोईर, ज्येष्ठ शिवैनिक मदन ओसवाल, अनिल पिंगळे यांच्यासह शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षातील तसेच, महाविकास आघाडीतील विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बैठकीत मतदारसंघातील महत्वाच्या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली. “आम्ही सारे, संजोग वाघेरे” म्हणूनच मतदारांपर्यंत पोहोचू, असा संकल्प उपस्थित शिवसैनिकांनी केला. शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाची मशाल सर्वापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी घेतली आहे. तसंच उध्दव ठाकरे साहेबांनी दिलेला संदेश घरोघरी कसा पोहोचेल, यासाठी आम्ही प्रयत्नशील असल्याचे आश्वासन यावेळी उपस्थित सर्वांनीच दिले.

### लढाई जिंकायची आहे : संजोग वाघेरे

*संजोग वाघेरे पाटील म्हणाले की, पिंपरी चिंचवडच्या राजकारणात मागील अनेक वर्षे योगदान देत असताना लोकांच्या अपेक्षांवर खरे उतरण्याचे काम केले. राज्याच्या राजकारणात शिवसेना पक्ष आणि उध्दव ठाकरे साहेबांना संकटात आणण्याचे काम केले गेले. सर्व बाजूंनी त्यांना घेरण्याचे काम सुरू आहे. पण नेटाने या सगळ्या संकटाचा सामना ते करत आहेत. त्यांना साथ देणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. त्यांच्यासोबत येऊन लढण्याची भूमिका घेतली. त्यांनी माझ्यावर मावळ लोकसभा संघटकपदाची जबाबदारी सोपवली. तेव्हापासून सर्व मतदारसंघात सर्व शिवसैनिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम आपण करत आहोत. आपल्या सर्वांना मिळून ही लढाई जिंकायची आहे, असे संजोग वाघेरे पाटील यांनी संवाद साधताना सांगितले. यासह मतदार संघातील प्रश्न मार्गी लावण्यासाठी आणि तुमच्यासाठी लढण्यासाठी आपण सदैव तत्पर राहू, हा विश्वास वाघेरे पाटील यांनी व्यक्त केला.*

---

# ‘अल्प इंजिनिअरिंग’च्या कर्मचाऱ्यांना तब्बल १३ हजारांची पगारवाढ!

## चाकण औद्योगीक क्षेत्रातील सर्वाधिक वेतनवाढ; स्वाभिमानी श्रमिक कामगार संघटना-कंपनी व्यवस्थापनात करार

। पिंपरी।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**स्वाभिमानी श्रमिक कामगार संघटना आणि अल्प इंजिनिअरिंग प्रा. लि. कंपनीमध्ये चाकण औद्योगिक पट्ट्यातील सर्वाधिक वेतनवाढ करार करण्यात आला. अल्प इंजिनिअरिंगच्या कर्मचाऱ्यांना तब्बल १२ हजार ८०० रुपयांची पगारवाढ देण्यात आली. त्यामुळे कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.**



चाकण औद्योगिक वसाहातीमधील निघोजे चाकण येथील अल्फ इंजिनीअरिंग प्रा. लि. व स्वाभिमानी श्रमिक कामगार संघटना यांच्यामध्ये तिसरा वेतनवाढ करार झाला. यावेळी संघटनेचे प्रमुख सल्लागार आमदार महेश लांडगे, प्रमुख सल्लागार रोहिदास गाडे पाटील, संघटनेचे अध्यक्ष जीवन येळवंडे, कंपनीचे डायरेक्टर पियर डिसूजा, प्लॅन्ट हेड विनोद टिपरे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पूर्णत्वास आला आहे.

करारावरती संघटनेच्या वतीने सरचिटणीस कृष्णा रोहोकले, उद्योजक राजु बोत्रे, चिटणीस रघुनाथ मोरे, खजिनदार अमृत चौधरी, दत्तात्रय गवारी, प्रशांत पाडेकर, रविंद्र भालेराव, सोमनाथ जानराव, गृपो कंपनीचे युनिट अध्यक्ष संजय पाटील, युनिट अध्यक्ष किशोर गोरखा, उपाध्यक्ष योगेश गाढवे, सरचिटणीस महेंद्र लाड, चिटणीस सुदाम गुळवे, खजिनदार राजेश सिंग, संघटक गणेश पवार, योगेश व्यवहारे,, एच. आर. मॅनेजर गंगाधर लहाने यांनी स्वाक्षरी केल्या आहेत. कामगारानी डीजेच्या तालावर नाचून, पेढे वाटून फटाक्यांची आतिषबाजी करून आनंद व्येक्त केला.

### करारामध्ये झालेले ठळक मुद्दे खलीलप्रमाणे..

**एकूण पगारवाढ** :- १२, ८०१/- ( बारा हजार आठशे एक रुपये), कराराचा कालावधी ०१/१२/२०२२ ते ३०/११/२०२५ या तीन वर्षांचा राहील. मेडिक्लेम पॉलीसी:- कुटुंबासाठी ३०००००/- रुपयांची पॉलिसी राहणार असून संपूर्ण खर्च कंपनी करणार या पॉलिसी मध्ये स्वतः, पत्नी, मुले यांचा समावेश करण्यात येणार आहे. मृत्यू साहाय्य योजना, ग्रुप एक्सीडेंट पॉलिसी, सुट्ट्या, दिवाळी बोनस, वैयक्तिक कर्ज सुविधा, गुणवंत कामगार पुरस्कार:- प्रत्येक वर्षी एक गुणवंत कामगारांची निवड करून त्यांना प्रत्येकी १००००/- ( दहा हजार) रुपये एवढी रक्कम प्रशस्तीपत्र व ट्रॉफी बक्षिस म्हणून देण्यात येणार आहे. कॅन्टीन आणि बस सुविधा अशा कामगार हिताच्या मुद्यांचा करारामध्ये समावेश आहे.



## भूमिका

# उत्सवाच्या पलीकडचा रॉबर्ट फ्रॉस्ट!

**ॲण्ड माइल्स टु गो बिफोर आय स्लीप..' या रॉबर्ट फ्रॉस्टच्या ओळी, कर्तव्याची सातत्यानं जाणीव करून देणाऱ्या. त्या म्हणे, स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या कार्यालयीन मेजावरल्या काचेखाली नेहमीसाठी होत्या.**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केनेडी यांच्या शपथग्रहण प्रसंगी अमेरिकेच्या मुक्तिलढयाविषयीची 'द गिफ्ट आउटराइट' ही जी कविता फ्रॉस्ट यांनी व्यासपीठावरून सादर केली, त्यात 'द डीड ऑफ गिफ्ट वॉज मेनी डीड्स ऑफ वॉर' अशी- अगदी आत्ताच्या गाझा-शिरकाणापर्यंत खरी ठरणारी ओळ होती. याच रॉबर्ट फ्रॉस्टच्या निवडक कवितांच्या संग्रहाची पहिली प्रत, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दिली (जून २०२३ मधल्या त्या भेटीत मोदींनीही बायडेन यांना छापील ग्रंथ दिला- श्रीमद्भगवद्गीता.).. असा एकंदर रॉबर्ट फ्रॉस्टचा दबदबा असूनही समीक्षक मात्र त्याला 'सामान्यांचा कवी' म्हणूनच ओळखतात. अमेरिकेचा 'राष्ट्रकवी' भले त्याच्या आधीच्या पिढीतला वॉल्ट व्हिटमन असेल; पण अमेरिकी कवितेचा इतिहास समजून घेण्यासाठी रॉबर्ट फ्रॉस्टसुद्धा तितकाच महत्त्वाचा आहे. त्यामुळे नोंद घेण्याजोगं हे की, सान दिएगो इथं बुधवारपासूनच रॉबर्ट फ्रॉस्टच्या स्मृत्यर्थ जंगी काव्योत्सव सुरू झाला आहे.म्हणजे सकाळपासून



नवोदित कवींसाठी कार्यशाळा, भर दुपारी व्याख्यान, उतरत्या दुपारी काव्यवाचन, संध्याकाळी महत्त्वाचे अभ्यासक आणि नामवंत कवी यांचं व्याख्यान आणि प्रश्नोत्तरं आणि अगदी रात्री नऊनंतरच पुस्तकांवर स्वाक्षऱ्या वगैरे घेण्यासाठी वेळ, असे कार्यक्रम सान दिएगोत २५ मार्चपर्यंत चालणार आहेत. रॉबर्ट फ्रॉस्टची जन्मतारीख २६ मार्च १८७४. त्याच्या आधीचे सहाही दिवस कार्यक्रम. यातल्या एका चर्चेच्या सत्रात भारतीय वंशाचे अमेरिकी कवी- कादंबरीकार अमित मजुमदार यांचाही समावेश आहे. 'रॉबर्ट फ्रॉस्ट सोसायटी' ही या कार्यक्रमाची आयोजक आहे. या संस्थेची स्थापना १९७८ मध्येच झाली असली आणि 'द रॉबर्ट फ्रॉस्ट रिव्ह्यू' या नावाचं नियतकालिकही या संस्थेतर्फे तेव्हापासूनच निघत असलं, तरी सन २००० पर्यंत या संस्थेला जागाच नव्हती. अखेर सान दिएगोच्या सार्वजनिक वाचनालयानं या संस्थेला आपल्याच इमारतीत कायमस्वरूपी जागा दिली, म्हणून हा उत्सवही रॉबर्ट फ्रॉस्ट जिथं वाढला, राहिला त्या मसाच्युसेट्स, न्यू हॅम्पशायर यांसारख्या राज्यात किंवा उत्तरायुष्य त्यानं जिथं घालवलं त्या बॉस्टन शहरात न होता कॅलिफोर्नियात भरतोय.

या निमित्तानं भारतातही रॉबर्ट फ्रॉस्टची आठवण काढायला हरकत नाही. 'द रोड नॉट टेकन'ला २०१५ मध्ये १०० वर्षे पूर्ण झाली, तेव्हाही 'लोकसत्ता- बुकमार्क'नं ती काढली होतीच. पण १५० व्या वाढदिवशी फ्रॉस्टला आठवताना, जनसामान्यांच्या ओठी ज्यांच्या कवितांच्या ओळी आजही असतात अशा कवींची स्मारकंही आठवून पाहावीत. डार्टमाउथ कॉलेजात १९४३ ते ४९ पर्यंत फ्रॉस्ट व्याख्याते म्हणून येत, त्यांच्या तेव्हाच्या विद्यार्थ्यांनी देणगी देऊन १९९६ मध्ये त्यांचा पूर्णाकृती पुतळा त्या कॉलेजच्या आवारात बसवला. तो आजही तिथं आहे. पण त्याखेरीज फ्रॉस्ट यांचं घर, स्मारक वगैरे काही नाही. जिथं रॉबर्ट फ्रॉस्टच्या कविता आठवतील, तिथंच त्याचं स्मारक. आपल्या विजय पाडळकरांनी मराठीत या फ्रॉस्टवर लिहिलेलं पुस्तक 'पर्सिपोलिस' ही चित्रकादंबरिका लिहून आणि त्यावर सिनेमा बनवून इराणी-फ्रेंच लेखिका मरजॉन सतरापी वाचकप्रिय झाली. इतकी की या पुस्तकाच्या २० लाखांहून प्रती विकल्या गेल्या. इस्लामी राजवट अचानक आल्यानंतर बदललेल्या स्त्रियांच्या आयुष्यावर ही चित्रकादंबरिका आहे. आत्ता ही लेखिका काय करीत आहे? केवळ हिजाब न घातल्याने नैतिक पोलिसांच्या मारहाणीत माहसा अमीनी या इराणी मुलीचा मृत्यू आणि त्यानंतरची निदर्शने, याबद्दलचे सतरापी हिचे नवे काम कसे आहे? याचा चित्रमय तपशील असलेला लेख.गेल्याच आठवडयाच्या सुरुवातीला टेलर स्विफ्ट या अमेरिकी गायिकेच्या 'फॅन बुक'ची सातवी आवृत्ती आली. स्विफ्टविषयी सारे काही असलेल्या या पुस्तकाची विक्री प्रचंड आहे, कारण जगभरातील कानाकोपऱ्यात अगदी भारतीय शहरात, उपनगरांत आणि गावांत तिची गाणी ऐकणारे चाहते आहेत. देशोदेशी तरुणाईत या फॅनबुकची खरेदी होते.

## संपादकीय »

### हम 'आप' के हैं कौन?

***केजरीवाल अहंमन्य आहेत, दोषीही असतील; पण त्यांच्या अटकेतून कुठल्याही परिस्थितीत लोकसभा जिंकण्यासाठी भाजपची होत असलेली तडफड उघड झाली..***

आम आदमी पक्ष अर्थात 'आप'चे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांना सक्तवसुली संचालनालयाने केलेल्या अटकेचा थेट संबंध सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक रोखेप्रकरणी दिलेल्या निकालाशी नाही याची खात्री कोणीही देणार नाही. आत्तापर्यंत कोणीही थेटपणे केंद्रातील सत्ताधारी भाजपवर आर्थिक घोटाळयांचे, भ्रष्टाचाराचे आरोप केले नव्हते. दहा वर्षांमध्ये पहिल्यांदाच भाजपला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाऊ लागले आहे. देशभर निवडणूक रोख्यांमुळे राजकीय गदारोळ माजला असताना, त्याची राळ कमळावर उडत असताना 'ईडी'ने केजरीवाल यांना अटक केली हा योगायोग कसा मानणार? बदल्यात कुठल्या देणगीदाराला कंत्राटी लाभ मिळाला हेही समोर येऊ लागलेले आहे. निवडणूक रोख्यांचा लपूनछपून सर्वाधिक लाभ मिळालेल्या भाजपला 'हमाम मे सब नंगे' असे म्हणण्याचीही सोय उरलेली नाही.

नुकत्याच झालेल्या एका विवाहपूर्व समारंभात केले गेलेले संपत्तीचे, ताकदीचे प्रदर्शन फक्त संबंधितांचेच नाही तर आपल्या सगळ्या समाजाचेच प्रतिनिधित्व करणारे होते. 'अंथरूण पाहून पाय पसरावेत' हा आपल्या वाडवडिलांनी दिलेला कानमंत्र बाजूला ठेवून आपण केव्हाच 'प्रत्येक क्षण आणि मिळेल ती गोष्ट ओरबाडून घ्या,' ही वाट धरली आहे.

# 'अंथरूण पाहून पाय पसरावेत'

खूप वर्षांपूर्वी म्हणजे अगदी लहानपणी पुण्याहून मामाच्या गावाला, म्हणजे मुंबईला सुट्टीमध्ये जाताना मुंबईची समृद्धी म्हणजे अचंबा वाटायचा. नरिमन पॉइंट येथील एअर इंडियाची इमारत, त्या काळातील एकमेव सरकता जिना, आलिशान हॉटेलसमोर गाड्यांमधून उतरणारे परदेशी प्रवासी व या सर्व नेत्रसुखाचा शेवट म्हणजे समुद्रकिनारी खारे दाणे आणि एखाद्या वेळेस चौपाटीवरील भेळपुरी. आम्हा सर्व लहान-थोरांची चैनीची अशी माफक मध्यमवर्गीय कल्पना होती! वर्षांतून एकदाच येणारी ही सुट्टी म्हणजे एकमेव विरंगुळा. पुण्याहून मुंबईला रेल्वेने प्रवास करणे हीसुद्धा चैनच. मामाचे सुरुवातीपासून निवृत्तीपर्यंत एकच एक कार्यालय. ते म्हणजे 'जीवन के साथ भी जीवन के बाद भी! पण तेही गजबजलेले कार्यालय भारी वाटायचे. मुंबईच्या या प्रवासात लक्षात राहणारी, लक्षात राहिलेली आणखी एक गोष्ट म्हणजे आमचा मामा सेकंड क्लासच्या कुर्ला लोकलमधील धोतर व झब्बा घातलेल्या



एका व्यक्तीची लांबून ओळख करून द्यायचा. " अरे त्याचे ऑपेरा हौस येथे सोन्या-चांदीचे मोठे दुकान आहे व शेअर बाजारातही त्याचा लाखो रुपयांचा व्यवसाय आहे. पण बघा किती साधा.. लोकलने जातो येतो! " थोडक्यात पैसे मिळवले तरी ते खर्च करायचे नाहीत, दाखवणे तर दूरच राहिले हा तो काळ होता- १९७० ते १९८५ चा.कालांतराने विशेषत: नव्वदीच्या दशकानंतर शिक्षित गटातील कुटुंबासाठी विद्या आणि लक्ष्मी यांचे नाते बदलले. ज्यांच्याकडे संगणकातील जी काही थोडी विद्या होती, त्याला लक्ष्मीने आपलेसे केले. रुपयांचे पगार डॉलरच्या पॅकेजमध्ये बदलले. ऑफशोअर-ऑनशोअर. आमचे अमेरिकेतील क्लाएंट असे नवे शब्द बोलण्यात येऊ लागले. वाय टू केच्या जागतिक संकटात भारतातील संगणक क्षेत्रातील अनेकांना हात धुऊन घेता आले. त्यामुळे 'अंथरूण पाहून पाय पसरणे' ही मध्यमवर्गीय मानसिकतेची गाडी 'कमवा आणि साठवा' या रुळावरून 'कमवा आणि खर्च करा' या स्टेशनकडे कधी वळली हे कळले नाही. गेल्या पंधरा वर्षांत सामाजिक माध्यमे एकापेक्षा एक गतीने लोकप्रिय झाल्यामुळे 'कमवा आणि खर्च करा' या दोन स्टेशनच्या नंतर सुपरफास्ट वेगाने 'त्याची जाहिरात करत गावभर फिरा' या नव्या स्टेशनची भर पडून घोडदौड करू लागली. त्याचेच एक अलीकडचे उदाहरण म्हणजे पश्चिम भारतात शाही थाटात साजरा झालेला एक लग्नपूर्व समारंभ. या कार्यक्रमाला बोलवणाऱ्या यजमानांनी या निमित्ताने आलेल्या पाहुण्यांना संपत्तीचे जे विद्रूप प्रदर्शन केले हा या लेखाचा विषय. व होळीच्या निमित्ताने प्रकटनही! आणि एक प्रकारे बदलत्या भारताचेही एक प्रातिनिधिक चित्र जे मला अस्वस्थ करणारे वाटते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**


**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# प्रकाश आंबेडकरांनी दिला अल्टिमेटम!

## 26 मार्चनंतर वंचित आपली पुढील भूमिका स्पष्ट करणार

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडी महाविकास आघाडीबरोबर जाणार असल्याची चर्चा मागील काही दिवसांपासून सुरू आहे. याबाबत काही बैठकादेखील पार पडल्या. मात्र, जागावाटपासंदर्भात अद्याप कोणताही निर्णय झाला नाही. त्यामुळे वंचित बहुजन आघाडीने अधिकृतपणे महाविकास आघाडीबरोबर जाण्यासंदर्भात भाष्य केले नाही. यातच आता वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी महाविकास आघाडीला २६ मार्चपर्यंतचा अल्टिमेटम दिला आहे.**



२६ मार्चनंतर वंचित बहुजन आघाडी आपली पुढील भूमिका स्पष्ट करणार असल्याचे ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले आहे.“महाविकास आघाडीच्या जागावाटपाचा तिढा अद्याप सुटलेला नाही. ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी नवीन पक्ष काढला असून एक यादी आमच्याकडे दिली आहे. त्यांना आम्ही सांगितले की, आमचे महाविकास आघाडीबरोबर भिजत घोंगडे कायम आहे. त्यामुळे आम्ही तुम्हाला आता काही सांगू शकत नाहीत. प्रकाश शेंडगे आणि आमच्यामध्ये दीड तास चर्चा झाली. त्यामध्ये ते कोणते मतदारसंघ मागतात, हे आम्ही ऐकूण घेतले”, असे ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले.“महाविकास आघाडीचे भांडण जर मिटत नसेल, तर आम्ही त्यांच्यामध्ये कुठे शिरायचे? आजही महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटामध्ये रस्सीखेच सुरू असून तिढा कायम आहे. त्यांचा तिढा सुटला की नाही? याबाबत आम्हाला माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे त्यांचा तिढा मिटणार नसेल तर आम्ही त्यांच्यामध्ये जाऊन तरी काय उपयोग? आम्ही फक्त २६ मार्चपर्यंत थांबणार आहोत. २६ तारखेला वंचित बहुजन आघाडीची जी काही भूमिका असेल ती आम्ही स्पष्ट करणार आहोत”, असा अल्टिमेटम प्रकाश आंबेडकर यांनी महाविकास आघाडीला दिला.कोल्हापूर लोकसभेसाठी काँग्रेसने शाहू महाराज छत्रपती यांना उमेदवारी जाहीर केली आहे. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी शाहू महाराज छत्रपती यांना पाठिंबा जाहीर केला आहे. “शाहू महाराज छत्रपती यांना आमच्या पक्षाच्या वतीने संपूर्ण पाठिंबा असून त्यांना निवडून आणण्यासाठी जे काय प्रयत्न असतील ते पक्षाच्यावतीने केले जातील”, असे प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले.वंचित बहुजन आघाडीच्यावतीने काँग्रेसला एक पत्र पाठवण्यात आले होते. यामध्ये वंचित बहुजन आघाडी काँग्रेसल सात जागांवर पाठिंबा देण्यास तयार असल्याचा प्रस्ताव होता. मात्र, या प्रस्तावावर अद्याप काँग्रेसच्या हायकमांडकडून कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. याबाबत प्रकाश आंबेडकर म्हणाले, “सात जागांसाठी आम्ही काँग्रेसला पाठिंबा देण्यास तयार आहोत. त्या सात जागा काँग्रेसने आम्हाला सांगाव्यात. त्यांनी सांगितल्यावर आम्ही त्यांना पाठिंबा देण्यास तयार आहोत. येत्या २६ तारखेला आम्ही आमची भूमिका जाहीर करणार आहोत”, असेही प्रकाश आंबेडकर म्हणाले.२६ मार्चनंतर वंचित बहुजन आघाडी आपली पुढील भूमिका स्पष्ट करणार असल्याचे ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले आहेओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी नवीन पक्ष काढला असून एक यादी आमच्याकडे दिली आहे.

### ठाकरे गटामध्ये रस्सीखेच सुरू

» आमचे महाविकास आघाडीबरोबर भिजत घोंगडे कायम आहे. त्यामुळे आम्ही तुम्हाला आता काही सांगू शकत नाहीत. प्रकाश शेंडगे आणि आमच्यामध्ये दीड तास चर्चा झाली. त्यामध्ये ते कोणते मतदारसंघ मागतात, हे आम्ही ऐकूण घेतले”, असे ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले.“महाविकास आघाडीचे भांडण जर मिटत नसेल, तर आम्ही त्यांच्यामध्ये कुठे शिरायचे? आजही महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटामध्ये रस्सीखेच सुरू असून तिढा कायम आहे. त्यामुळे त्यांचा तिढा मिटणार नसेल तर आम्ही त्यांच्यामध्ये जाऊन तरी काय उपयोग? आम्ही फक्त २६ मार्चपर्यंत थांबणार आहोत. २६ तारखेला वंचित बहुजन आघाडीची जी काही भूमिका असेल ती आम्ही स्पष्ट करणार आहोत”, असा अल्टिमेटम प्रकाश आंबेडकर यांनी महाविकास आघाडीला दिला.कोल्हापूर लोकसभेसाठी काँग्रेसने शाहू महाराज छत्रपती यांना उमेदवारी जाहीर केली आहे. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी शाहू महाराज छत्रपती यांना पाठिंबा जाहीर केला आहे. “शाहू महाराज छत्रपती यांना आमच्या पक्षाच्या वतीने संपूर्ण पाठिंबा असून त्यांना निवडून आणण्यासाठी जे काय प्रयत्न असतील ते पक्षाच्यावतीने केले जातील.

# मनोज जरांगे पाटील यांना तडीपार करणार का?

## तडीपार करण्यासारखे त्यांच्यावर खटले दाखल आहेत का?

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केले होते. माझ्यावर खोटे गुन्हे दाखल करून मला तडीपार केले जाऊ शकते, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले होते.**

त्यांच्या या आरोपावर देवेंद्र फडणवीस यांची प्रतिक्रिया माध्यमांनी विचारली असता गृहमंत्री असलेल्या फडणवीसांनी यावर उत्तर दिले आहे. ते म्हणाले, “आमचे खूप हितचिंतक आहेत. ते हितचिंतक मनोज जरांगे पाटील यांच्याकडे जाऊन काहीतरी सांगत असतात. त्यावर जरांगे पाटील बोलतात. असं कुणालाही तडीपार केले जात नाही. तडीपार करण्यासारखे त्यांच्यावर खटले दाखल आहेत का? तर तसे अजिबात नाही.देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, अनेक लोक वाहत्या गंगेत हात धुवून घेण्याचे काम करत असतात. अशी लोक जरांगे पाटील यांना काहीतरी सांगत असतात. जरांगे पाटील आणि



आंदोलकांवर ज्या केसेस दाखल आहेत, त्या मागे घेतल्या जाणार आहेत. ज्याठिकाणी जाळपोळ, तोडफोड झाली, पोलिसांवर हल्ला झालेला आहे, अशा केसेस परत घेणे शक्य होणार नाही. मात्र इतर केसेस परत घेण्याची घोषणा करून त्यावर कामही सुरू केले आहे. सध्या २४ जिल्ह्यांमध्ये तपासावर असलेल्या एकूण ४९२ केसेस आहेत. त्याची छाननी सुरू झाली आहे. १७२ केसेस परत घेण्यासंदर्भात शिफारसही दिली आहे. सहा केसेस मागे घेण्यास पोलिसांनी नकार दिला आहे. उर्वरित केसेसची छाननी सुरू आहे.सध्या आचारसंहिता लागली आहे. या काळात छाननी पूर्ण करून आचारसंहिता संपताच त्या केसेस मागे घेतल्या जातील. केसेस मागे घेण्यासाठी संबंधित लोकांना जबाबासाठी पुन्हा बोलवावे लागते. त्याची एक कायदेशीर प्रक्रिया असून ती पूर्ण करावीच लागते. पण जबाब नोंदविण्यासाठी समन्स बजावले तरी नवीन केस दाखल झाली, असे सांगितले जाते. मग वेगवेगळ्या प्रकारच्या गोष्टी बोलल्या जातात.

### मी शिवसेना प्रवक्ता नाही

» सगेसोयरे शब्द असेल किंवा केसेस मागे घेण्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांची घोषणा असेल, ती अंतिम आहे. असेही देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.राज ठाकरे यांचा पक्ष शिवसेना शिंदे गटात जाणार असले बोलले जात आहे. यावर प्रश्न विचारला असता देवेंद्र फडणवीस म्हणाले. की, असा कुणाचा प्रश्न कोणत्याही दुसऱ्या पक्षाकडे जात नसतो. मी शिवसेना किंवा राज ठाकरेंचा प्रवक्ता नाही.

# तुरुंगातून टोळ्या चालवल्या जातात!

## भाजपा खासदार मनोज तिवारी यांची तिखट प्रतिक्रिया!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गुरुवारी कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी ईडीकडून दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आपचे अध्यक्ष अरविंद केजरीवाल यांना अटक करण्यात आली आहे. त्यानंतर त्यांच्या अडचणींत वाढ होताना दिसत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून ईडीकडून अरविंद केजरीवाल यांची चौकशी सुरू होती. तसंच त्यांना चौकशीकरता ईडी कार्यालयात बोलावण्यात आले होते. तब्बल ९ वेळा समन्स बजावण्यात आले होते. परंतु, प्रत्येकवेळी अरविंद केजरीवाल यांनी ईडी कार्यालयात जाणं टाळलं. केजरीवालांना अटक झाल्यावर असा प्रश्न अनेकांना पडला होता कि आता दिल्ली सरकारचं काय होणार? यावर आम आदमी पार्टीच्या नेत्यांनी स्पष्टीकरण दिलं आहे.**




"केजरीवालच दिल्लीचे मुख्यमंत्री म्हणून कायम राहतील आणि तुरुंगातून आपली कर्तव्ये पार पाडतील", असे आम आदमी पार्टीने जाहीर केलं होत. "अरविंद केजरीवाल दिल्लीचे मुख्यमंत्री आहेत आणि राहतील. यामध्ये कोणतंही दुमत नाही", असं आप नेत्या आतिशी यांनी स्पष्ट केल होतं. यावरूनच आता भाजपाचे खासदार आणि दिल्लीचे माजी प्रदेशाध्यक्ष मनोज तिवारी यांनी खोचक प्रतिक्रिया दिली आहे. तुरुंगातून टोळ्या चालवल्या जातात, सरकार नाही, असं त्यांनी म्हटलं आहे."तुम्ही टोळ्या चालवायची तयारी करताय का? सरकार चालवण्यासाठी रोज बैठका घ्यायच्या असतात, विविध स्तरांवर पत्रके काढायची असतात, सह्या करायच्या असतात. तुम्ही निवडून गेलात म्हणजे जनेतचा पैसा लुटायला मोकळे झालात का?" असा प्रश्न त्यांनी केला. ते पुढे म्हणाले, "दिल्लीत त्यांनी कोणतीही कामे केली नाहीत. फक्त दिल्लीकरांना लुबाडायचे काम केले आहे". याशिवाय फक्त माध्यमांमध्ये केजरीवालांच्या अटकेची चर्चा होत आहे, दिल्लीतील जनतेमध्ये यावर कोणत्याही चर्चा होत नाहीत. केजरीवालांच्या अटकेने जनता आनंदी आहे. एवढंच नाही, तर आपचे नेतेसुद्धा आनंदी आहेत, अशी खोचक प्रतिक्रिया मनोज तिवारी यांनी एएनआयशी बोलताना दिली आहे.काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश म्हणाले की, "इंडिया आघाडीतील पक्षांना भीती घालायला ही कारवाई केली आहे. इंडिया आघाडी सत्तेत येईल अशी भीती भाजपाला वाटत आहे. म्हणून अशा कारवाया केल्या जात आहेत." झारखंडचे तत्कालीन माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक करणे हा लोकशाही आणि संविधानावरील हल्ला असल्याचं त्यांनी आपल्या प्रतिक्रियेत सांगितलं.दिल्लीचे भाजपा प्रदेशाध्यक्ष विरेंद्र सचदेव यांनी दिल्ली मद्य घोटाळा प्रकरणातील मुख्य सूत्रे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्याच हातात असल्याचा आरोप करून यातील सत्य लवकरच बाहेर येईल असं म्हटलं आहे. "कायदा सर्वांसाठी सारखा असतो. दोन महिन्यांपासून ईडीच्या नोटिसांना उत्तर दिलं गेलं नाही. कायदा पाळला गेला नाही. त्यामुळे आज हे सिद्ध झालं आहे की कायदा हा सामान्य जनतेला जसा लागू होतो तसाच तो मुख्यमंत्र्याला सुद्धा लागू होतो." दरम्यान अरविंद केजरीवाल यांना शुक्रवारी २८ मार्च पर्यंत ईडी कोठडी सुनावण्यात आली आहे.न्यायालयासमोरील आपल्या युक्तिवादात ईडीने आरोप केला की व्यावसायिकांकडून पैशांची मागणी करण्याचे मुख्य कटकारस्थान दिल्लीचे मुख्यमंत्री यांनीच केलेले असून पुढे दावा केला की केजरीवाल हे उत्पादन शुल्क धोरणाच्या निर्मितीमध्ये थेट सहभागी होते.

### जनेतचा पैसा लुटायला मोकळे ?

» ईडीच्या वकिलांनी दावा केला की, आपचे मीडिया प्रभारी विजय नायर हे दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल यांच्यासाठी काम करत होते. ईडीच्या वकिलांनी पुढे असा दावा केला की गुन्ह्यातील कमाई ही केवळ १०० कोटी रुपये नाही तर लाच देणाऱ्यांनी कमावलेला नफा देखील गुन्ह्यातील कमाई म्हणूनच मानला जायला हवा. वकिलांनी सांगितले की हवाल्याचे ४५ कोटी रुपये गोवा निवडणुकीत वापरले गेले होते. "केजरीवालच दिल्लीचे मुख्यमंत्री म्हणून कायम राहतील आणि तुरुंगातून आपली कर्तव्ये पार पाडतील", असे आम आदमी पार्टीने जाहीर केलं होत. "अरविंद केजरीवाल दिल्लीचे मुख्यमंत्री आहेत आणि राहतील. यामध्ये कोणतंही दुमत नाही", असं आप नेत्या आतिशी यांनी स्पष्ट केल होतं. यावरूनच आता भाजपाचे खासदार आणि दिल्लीचे माजी प्रदेशाध्यक्ष मनोज तिवारी यांनी खोचक प्रतिक्रिया दिली आहे. तुरुंगातून टोळ्या चालवल्या जातात, सरकार नाही, असं त्यांनी म्हटलं आहे."तुम्ही टोळ्या चालवायची तयारी करताय का? सरकार चालवण्यासाठी रोज बैठका घ्यायच्या असतात, विविध स्तरांवर पत्रके काढायची असतात, सह्या करायच्या असतात. तुम्ही निवडून गेलात म्हणजे जनेतचा पैसा लुटायला मोकळे झालात का?

# काँग्रेसचे सहा बंडखोर आमदार भाजपात!

## भाजपाचे उमेदवार जिंकल्यास सरकार कोसळण्याची शक्यता

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राज्यसभा निवडणुकीच्या वेळी क्रॉस व्होटिंग केल्याने विधानसभा अध्यक्षांनी काँग्रेसच्या सहा आमदारांना अपात्र घोषित केले होते. या सहा आमदारांनी तीन अपक्ष आमदारांसह शुक्रवारी दिल्लीत भाजपात जाहीर प्रवेश केला. यामुळे काँग्रेसला आता मोठा धक्का मानला जात आहे.**




सहा आमदारांनी राजीनामा दिला असल्याने येथे १ जून रोजी पोटनिवडणूक होणार आहे. या पोटनिवडणुकीत भाजपाचे उमेदवार जिंकून आल्यास काँग्रेसचं सरकार कोसळण्याची शक्यता आहे.नुकत्याच झालेल्या राज्यसभेच्या निवडणुकीत काँग्रेसच्या सहा आमदारांनी भाजपाच्या उमेदवाराला मतदान केले होते. त्यामुळे संख्या असतानाही काँग्रेसच्या अभिषेक मनू सिंघवी यांचा पराभव झाला होता. या निवडणुकीत काँग्रेसचे सहा आमदार व तीन अपक्ष अशा नऊ जणांनी भाजपाच्या उमेदवाराला मतदान केल्याने हर्ष महाजन विजयी झाले. दरम्यान, २९ फेब्रुवारी रोजी विधानसभा अध्यक्षांनी काँग्रेसच्या सहा आमदारांना अपात्र ठरविले होते. तसंच, आशिष शर्मा (हमीरपूर मतदारसंघ), होशियार सिंग (डेहरा) आणि केएल ठाकूर (नालागढ) या तीन अपक्ष आमदारांनी शुक्रवारी विधानसभा सचिव यश पॉल शर्मा यांच्याकडे राजीनामा सुपूर्द केला आणि ते भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. २०२२ च्या विधानसभा निवडणुकीत या तिन्ही अपक्ष आमदारांनी भाजपाचं तिकीट मागितलं होतं परंतु त्यांना तिकीट नाकारण्यात आलं आणि अपक्ष म्हणून निवडणूक लढवली. मात्र, नंतर काँग्रेसने ४० आमदारांसह सरकार स्थापन केले तेव्हा तीन अपक्षांनी सरकारला पाठिंबा दिला.भाजपात प्रवेश केलेल्या अपक्ष आमदारांनी सांगितले की, मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुखू अशा पातळीवर झुकले आहेत की ते आम्हाला आणि आमच्या कुटुंबियांना लक्ष्य करत आहेत आणि त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल केले जात आहेत.

### हिमाचल प्रदेशमध्ये अटीतटीची लढत

» अपक्ष आमदारांनी राजीनामे देऊ नयेत आणि जनतेच्या आदेशाचा आदर करायला हवा होता. या संपूर्ण प्रकरणामध्ये पैशांचा सहभाग होता की आमदारांवर दबाव होता, हे तपासण्याचा विषय आहे.काँग्रेसचे सहा आमदार अपात्र ठरल्याने ६८ सदस्यीय विधानसभेत सत्ताधारी काँग्रेसचे संख्याबळ ४० वरून ३४ वर आले आहे. तर भाजपचे २५ आमदार आहेत. पोटनिवडणुकीत भाजपाचे सहा आमदार जिंकून आल्यास भाजपाचं संख्याबळ ३१ होणार आहे. तसंच, तीन अपक्षांचा पाठिंबा मिळाल्याने ही संख्या ३४ वर जाईल. त्यामुळे आगामी काळात हिमाचल प्रदेशमध्ये अटीतटीची लढत दिसणार आहे.

# आतिफ अस्लमने दाखवली लेकीची पहिली झलक

बॉलिवूड गाण्यांमधून लोकप्रियता मिळवणाऱ्या आतिफ अस्लमचे केवळ भारतातच नव्हे तर जगभरात चाहते आहेत. या सुप्रसिद्ध गायकाला एका वर्षापूर्वी कन्यारत्नाचा लाभ झाला. आतिफची पत्नी साराने २३ मार्च २०२३ला गोंडस बाळाला जन्म दिला आणि सोशल मीडियावरुन आतिफने बाबा झाल्याची गुडन्यूज चाहत्यांना दिली होती. आज (२३ मार्च रोजी) आतिफ त्याच्या गोंडस मुलीचा पहिला वाढदिवस साजरा करत आहे त्यानिमित्ताने आतिफने पहिल्यांदाच त्याच्या मुलीचा हलीमाचा फोटो शेअर केला आहे.आतिफ अस्लमने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक फोटो शेअर केला आहे. बरोबर एका वर्षानंतर आज पहिल्यांदाच त्याने हलीमाचा चेहरा जगासमोर आणला आहे. पहिल्या फोटोत बाबा आतिफ हलीमाबरोबर खेळताना दिसतोय. तर दुसऱ्या फोटोत सफेद फ्रॉकवर हलिमा एकदम गोंडस दिसत आहे. या पोस्टला आतिफने कॅप्शन देत लिहिले, "बाबाने राजकन्येचे शूज खिशात ठेवले आहेत, जेव्हा माझ्या हलीमाला तो हवा असेल तेव्हा ती सांगेल. २३/०३/२०२३- तुला वाढदिवसाच्या खूप साऱ्या शुभेच्छा.

"आतिफच्या लाडक्या लेकीचा फोटो सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या पोसटवर आतिफच्या अनेक चाहत्यांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. एकाने कमेंट करत लिहिले, "किती सुंदर आहे हलीमा, तुला वाढदिवसाच्या खूप शुभेच्छा". "अल्लाह तुमच्या जीवनात आनंद आणि आशीर्वाद घेऊन येवो. वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा गोंडस हलीमा" असं दुसऱ्याने लिहिलं.दरम्यान, आतिफ अस्लमच्या वैयक्तिक आयुष्याबाबत सांगायचं झालं तर, २०१३मध्ये आतिफने साराशी लाहौरमध्ये निकाह केला होता. त्यांना अब्दुल व अर्यान ही दोन मुले आहेत आणि हलीना त्यांची तिसरी अपत्य आहे. पाकिस्तानी सिंगर असलेल्या आतिफने बॉलिवूडमध्ये नाव कमावलं. त्याची अनेक गाणी लोकप्रिय आहेत.बॉलिवूड गाण्यांमधून लोकप्रियता मिळवणाऱ्या आतिफ अस्लमचे केवळ भारतातच नव्हे तर जगभरात चाहते आहेत. या सुप्रसिद्ध गायकाला एका वर्षापूर्वी कन्यारत्नाचा लाभ झाला. आतिफची पत्नी साराने २३ मार्च २०२३ला गोंडस बाळाला जन्म दिला आणि सोशAल मीडियावरुन आतिफने बाबा झाल्याची गुडन्यूज चाहत्यांना दिली होती.

## गोविंदाने पुन्हा केलं लग्न

सध्या बॉलीवूड अभिनेता गोविंदा खूप चर्चेत आला आहे. एकाबाजूला तो राजकारणात पुन्हा एन्ट्री करणार असल्याची चर्चा आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंबरोबर त्याची भेट झाल्याचं म्हटलं जात आहे. त्यामुळे गोविंद पुन्हा एकदा लोकसभा निवडणुकाच्या रिंगणात उतरणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. अशातच दुसऱ्या बाजूला गोविंदाने ३७ वर्षांनंतर पुन्हा एकदा लग्न केलं आहे. याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होतं आहे. अभिनेता गोविंदा व त्याची पत्नी सुनीता आहुजा 'डान्स दिवाने'च्या चौथ्या पर्वात उपस्थित राहिले होते. याच सेटवर 'कलर्स टीव्ही'च्या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे.या व्हिडीओत, माधुरी दीक्षित म्हणतेय "आमच्याकडे लग्नाचे फोटो देखील नाहीयेत." तर माधुरी म्हणते, "फोटो नाहीत, काही हरकत नाही. 'डान्स दिवाने'चं कुटुंब आहे.

## कंगना अडकणार लग्नबंधनात?



मागील काही महिन्यांत अनेक बॉलीवूड कलाकार आपल्या आयुष्याला नवीन सुरुवात करीत लग्नबंधनात अडकले आहेत. आधी रकुल प्रीत सिंग व जॅकी भगनानी आणि आता क्रिती खरबंदा व पुलकित सम्राट यांनी लग्नगाठ बांधली. आता बॉलीवूडची क्वीन कंगना रणौतही तिच्या नवीन आयुष्याला लवकरच सुरुवात करणार असल्याची माहिती समोर आली आहे. कंगनाने आपल्या लग्नाचे कपडेदेखील निवडले असल्याची चर्चा सुरू आहे. 'रेडिट'वर आलेल्या माहितीनुसार, कंगना आपल्या लग्नातील पोशाख एका ड्रेस डिझायनरकडून तयार करून घेणार आहे. कंगनाचा हा ड्रेस डिझायनर इंडस्ट्रीमधलाच आहे; पण तितकासा सुप्रसिद्ध नाही. कंगनाच्या लग्नाबद्दलच्या गोष्टी खासगी ठेवण्यात आल्या आहेत. कंगना कोणाशी लग्न करणार आहे हे अजून जाहीर झालं नसलं तरी तिचा बॉयफ्रेंड आहे, असं तिनं आधी कबूल केलं होतं.रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात कंगनानं हजेरी लावली होती. त्यादरम्यान, कंगना आणि निशांतचे अयोध्येतील राम मंदिरातील काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते आणि त्यामुळेच कंगना निशांतला डेट करीत असल्याच्या चर्चांना उधाण आलं होतं. पण, अभिनेत्रीनं या अफवा असल्याचं स्पष्ट केलं आणि ती दुसऱ्याच कोणाला तरी डेट करतेय; परंतु तो निशांत नाही, असा खुलासा तिनं केला होता.निशांत पिट्टीबरोबर कंगनाचं अफेअर असल्याचा दावा करणाऱ्या मीडिया रिपोर्टचा स्क्रीनशॉट शेअर करीत कंगनानं तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर लिहिलं, "माझी मीडियाला नम्र विनंती आहे की, कृपया चुकीची माहिती पसरवू नका. निशांतजी विवाहित आहेत आणि मी दुसऱ्या कोणाला तरी डेट करीत आहे. योग्य वेळ आल्यावर मी त्याबद्दल सांगेन. एका महिलेनं एखाद्या पुरुषाबरोबर फोटो काढल्यानं रोज तिचं नाव एखाद्या नवीन पुरुषाशी जोडणं योग्य नाही."मध्यंतरी कंगना एका परदेशी व्यक्तीबरोबर हातात हात धरून चालताना दिसली होती. तेव्हा तो तिचा बॉयफ्रेंड असल्याच्या चर्चाही सुरू होत्या. कंगना स्पष्टवक्ती आहे आणि प्रत्येक गोष्ट ती सोशल मीडियावर शेअर करते. अशात तिच्या लग्नाची बातमी ती चाहत्यांपासून का लपवून ठेवेल.

## शाहरुख खान करतो कोटींची कमाई

शाहरुख खानला बॉलीवूडमधील किंग खान या नावाने ओळखले जाते. शाहरुखचं वैयक्तिक आयुष्यही एका राजासारखंच आहे. शाहरुख आपल्या अभिनयाच्या जोरावर एका चित्रपटात कोटींची कमाई करतो. अभिनय क्षेत्रात तर किंग खानचा पाय रोवला गेला आहे पण शाहरुख क्रिकेटद्वारेसुद्धा बक्कळ कमाई करतो. २०२४च्या आयपीलच्या हंगामाला सुरूवात झाली असून कालच 'चेन्नई सुपर किंग्ज' विरुद्ध 'रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू' यांचा पहिला सामना पार पडला. 'चेन्नई सुपर किंग्ज'ने या सामन्यात बाजी मारली. तर आज 'कोलकाता नाइट रायडर्स' आणि 'सनरायझर्स हैदराबाद' यांचा सामना सुरू झाला आहे. शाहरुख खान 'कोलकाता नाइट रायडर्स' या टीमचा मालक आहे. आयपीलमधून दरवर्षी शाहरुखची किती कमाई होते याबद्दल जाणून घेऊयात.प्रत्येक आयपीएल संघाला टीव्ही ब्रॉडकास्ट आणि बीसीसीआयच्या प्रायोजकत्वातून मिळणाऱ्या कमाईचा काही हिस्सा मिळतो. शाहरुख खान आयपीएलमधील 'कोलकाता नाईट रायडर्स' संघाचा मालक आहे. या संघाद्वारे, शाहरुख खान ब्रँड एंडोर्समेंट्स, मॅच फी, फ्रँचायझी फी, BCCI इव्हेंट रेव्हेन्यू आणि बक्षीस रकमेतून भरपूर कमाई करतो. मात्र, यातून त्यांना किती कोटींची कमाई होते, याचा खुलासा झालेला नाही. मीडिया रिपोर्ट्सनुसार, शाहरुख खान आयपीएलमधील त्याच्या टीममधून दरवर्षी २५० ते २७० कोटी रुपयांची कमाई करतो. मात्र, या सामन्यांमध्ये अंदाजे १०० कोटींचा खर्चही होतो. हा सगळा खर्च खेळाडूंच्या खरेदी आणि व्यवस्थापनावर होतो.'कोलकाता नाईट रायडर्स'ची या संघाची कमाई १५० कोटींहून अधिक आहे. या संघात शाहरुख खानची हिस्सेदारी ५५ टक्के आहे, त्यामुळे अभिनेता दरवर्षी आयपीएलमधून ७० ते ८० कोटी कमावतोआयपीएल सुरू झाले तेव्हा शाहरुखने अभिनेत्री जुही चावला आणि तिचा पती जय मेहता यांच्या भागीदारीत संघ विकत घेतला.



## 'मिस युनिव्हर्स' मध्ये सहभागी होण्यास मनाई

उर्वशी रौतेलाने तिच्या करिअरची सुरूवात मॉडेलिंगपासून केली. २०१२ साली 'आय एम शी – मिस युनिव्हर्स इंडिया' सौंदर्यस्पर्धेत ती जिंकली होती. परंतु 'मिस युनिव्हर्स' २०१२ मध्ये तिला सहभागी होता आले नाही याची खंत तिला नेहमी वाटते. २०१२ सालची 'आय एम शी – मिस युनिव्हर्स इंडिया' स्पर्धा जिंकल्यानंतर उर्वशी रौतेलाचं पुढचं ध्येय 'मिस युनिव्हर्स' जिंकण्याचं होतं. परंतु, शेवटच्या क्षणी काही अडचणी आल्यामुळे तिला ते साध्य करता आलं नाही. तेव्हा भारताचे प्रतिनिधी निवडण्याची जबाबदारी सुष्मिता सेन यांच्या कंपनीकडे होती.'मिरची प्लस'ला दिलेल्या मुलाखतीत उर्वशीने याबाबत खुलासा केला. ती म्हणाली, "मी जेव्हा २०१२ मध्ये पहिल्यांदा 'मिस युनिव्हर्स इंडिया'चा किताब जिंकले. तेव्हा डोनाल्ड ट्रम्प आमचे बॉस होते 'मिस युनिव्हर्स'साठी वयाची मर्यादा आहे. 'मिस युनिव्हर्स'स मध्ये सहभाग घेण्यासाठी वय मर्यादा १८ होती. याबद्दल मला काहिचं माहित नव्हतं. मी तेव्हा १७ वर्षांची होती आणि लवकरच १८ वर्षांची होणार होती.

# किंग खानची केकेआरच बाजीगर!

## शेवटच्या चेंडूवर कोलकाताने मिळवला विजय

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**कोलकाता संघाने सामन्याच्या अखेरच्या चेंडूवर ४ धावांनी हैदराबाद संघावर विजय मिळवला. डेथ ओव्हर्समध्ये संघाच्या हातून निसटलेला सामना हर्षित राणाने अखेरच्या षटकात केकेआरच्या दिशेने वळवला. कोलकाताने दिलेल्या २०९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना हैदराबादचा संघ २०४ धावा करण्यात यशस्वी झाला. अखेरीस केकेआरच्या संघाने दणदणीत विजय मिळवला. आंद्रे रसेलच्या पहिल्या डावात षटकार-चौकारांच्या आतिषबाजीसह केलेल्या ६४ धावा आणि दुसऱ्या डावात २ विकेट्सही घेतले. पण हैदराबादच्या संघानेही काही हार नाही मानली.**



हेनरिक क्लासेनने डेथ ओव्हर्समध्ये षटकारांचा सिलसिला सुरू करत सामन्याचा रोख बदलला होता. पण कोलकाताला विजय मिळवण्यात यश आले. कोट्यवधी रूपये खर्चून संघात सामील केलेला मिचेल स्टार्क अयशस्वी ठरला पण हर्षित राणा कोलकातासाठी हुकुमाचा एक्का ठरला.६ चेंडूत १३ धावांची गरज असताना हर्षित राणाकडे गोलंदाजी सोपवली. शेवटचे षटक टाकताना पहिल्याच चेंडूवर क्लासेनने षटकार खेचला. दुसऱ्या चेंडूवर १ धाव घेत शाहबाजकडे स्ट्राईक दिली. तिसऱ्या चेंडूवर शाहबाज श्रेयस अय्यरकडून झेलबाद झाला. चौथ्या चेंडूवर नुकत्याच आलेल्या यान्सनने एक धाव घेत क्लासेनला स्ट्राईक दिली. २ चेंडू ५ धावांची आवश्यकता असताना क्लासेनकडे स्ट्राईक होती त्याने चेंडू हवेत लगावला खरा पण सुयश शर्मा त्याचा झेल टिपला आणि त्याला तंबूत धाडले. यानंतर हर्षित राणाने सहाव्या चेंडूवर एकही धाव न दिल्याने कोलकाताने ४ धावांनी हा अटीतटीचा सामना जिंकला.कोलकाताने दिलेल्या डोंगराएवढ्या लक्ष्याचा पाठलाग करताना हैदराबादकडू इम्पॅक्ट प्लेअर म्हणून अभिषेक शर्मा(३२) आणि मयंक अग्रवाल (३२) यांना सलामीसाठी उतरले. या दोघांनीही संघाला चांगली सुरूवात करून दिली. पण मोठी खेळी करू शकले नाहीत आणि हर्षित राणाच्या गोलंदाजीवर मयंक तर रसेलच्या गोलंदाजीवर अभिषेक बाद झाले. त्यानंतर राहुल त्रिपाठी (२०) आणि एडन मारक्रम (१८) यांनी बाद होण्यापूर्वी धावांमध्ये योगदान दिले. त्यानंतर आलेला अब्दुल समद १५ धावा करत परतला. पण हेनरिक क्लासेनचे जणू तुफान आले होते. आंद्रे रसेलच्या ६३ धावांच्या तोडीस तोड खेळी करत त्याने हैदराबादला सामन्यात कायम ठेवले. हेनरिकने अखेरच्या षटकात बाद होण्यापूर्वी २९ चेंडूत ८ षटकारांच्या मदतीने ६३ धावा केल्या. तर शाहबाज अहमदने ५ चेंडूत २ षटकार आणि एका चौकारांच्या मदतीने १६ धावा केल्या.कोलकाताकडून हर्षित राणाने ३ षटाकांत ३३ धावा देत सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. तर वरूण चक्रवर्ती आणि मिचेल स्टार्क हे दोन्ही खेळाडू महागडे ठरले, त्यांनी ४ षटकांत अनुक्रमे ५५ आणि ५३ धावा दिल्या. पण वरूणला एक विकेट घेण्यात यश आले. केकेआरच्या संघातील आयपीएलमधील सर्वात महागडा खेळाडू मिचेल स्टार्क हा पूर्णपणे अपयशी ठरला. तर सुनील नारायण १ आणि रसेलने २ विकेट्स मिळवल्या. कोलकाताने प्रथम फलंदाजी करताना७ बाद २०८ धावा केल्या होत्य. रमणदीप सिंग(३५), रिंकू सिंग(२३) आणि आंद्रे रसेल (६४) यांनी सर्वाधिक धावांचे योगदान दिले. रसेलच्या बॅटमधून तर धावांचा पाऊस पडला आणि रिंकूसोबत ७व्या विकेटसाठी त्यांनी ८४ धावांची भागीदारी केली.

### कोलकाताला विजय मिळवण्यात यश

हैदराबादकडून नटराजने ४ षटकांत ३२ धावा देत सर्वाधिक ३ विकेट्स मिळवल्या. तर मार्कंडेयने ३९ धावा देत २ विकेट्स मिळवल्या. नवा कर्णधार कमिन्सलाही १ विकेट घेण्यात यश आले.हेनरिक क्लासेनने डेथ ओव्हर्समध्ये षटकारांचा सिलसिला सुरू करत सामन्याचा रोख बदलला होता. पण कोलकाताला विजय मिळवण्यात यश आले. कोट्यवधी रूपये खर्चून संघात सामील केलेला मिचेल स्टार्क अयशस्वी ठरला पण हर्षित राणा कोलकातासाठी हुकुमाचा एक्का ठरला.६ चेंडूत १३ धावांची गरज असताना हर्षित राणाकडे गोलंदाजी सोपवली. शेवटचे षटक टाकताना पहिल्याच चेंडूवर क्लासेनने षटकार खेचला. दुसऱ्या चेंडूवर १ धाव घेत शाहबाजकडे स्ट्राईक दिली. तिसऱ्या चेंडूवर शाहबाज श्रेयस अय्यरकडून झेलबाद झाला. २ चेंडू ५ धावांची आवश्यकता असताना क्लासेनकडे स्ट्राईक होती त्याने चेंडू हवेत लगावला खरा पण सुयश शर्मा त्याचा झेल टिपला आणि त्याला तंबूत धाडले.

# पंजाब किंग्जचा दिल्लीवर दणदणीत विजय!

## शिखर धवनने पहिल्या सामन्यात रचला इतिहास

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**दुसरा सामना शनिवारी महाराजा यादविंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, चंदिगड येथे पार पडला. या सामन्यात दिल्ली कॅपिटल्स आणि पंजाब किंग्ज आमनेसामने आले होते. ज्यामध्ये सॅम करनच्या दमदार अर्धशतकाच्या जोरावर दिल्ली कॅपिटल्सवर ४ विकेट्सनी मात करत आपला पहिला विजय नोंदवला. तत्पूर्वी दिल्ली कॅपिटल्सने प्रथम फलंदाजी करताना अभिषेक पोरेलच्या वादळी खेळीच्या जोरावर ९ बाद १७४ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात पंजाब किंग्जने १९.२ षटकांत ६ गडी गमावून विजय मिळवला.**



कर्णधार शिखर धवनने १७५ धावांचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या पंजाब किंग्जला वेगवान सुरुवात करून दिली. त्याने १६ चेंडूत २२ धावा केल्या, मात्र जॉनी बेअरस्टो ३ चेंडूत ९ धावा करून धावबाद झाला. मधल्या षटकांमध्ये पंजाबची धावगती खूपच कमी राहिली आणि वेळोवेळी विकेट पडत राहिल्या. यानंतर प्रभसिमरन सिंगने १७ चेंडूत २६ धावा केल्या, पण सॅम करनच्या शानदार अर्धशतकाच्या खेळीने पंजाब किंग्जला विजयापर्यंत नेले. त्याने ४७ चेंडूत ६३ धावांची खेळी खेळली. दरम्यान, खलील अहमदने १९ व्या षटकात सलग २ विकेट्स घेत सामना रोमांचक बनवला होता. मात्र लियाम लिव्हिंगस्टोनने २१ चेंडूत ३८ धावांची खेळी करताना षटकार मारुन पंजाब किंग्जला विजय मिळवून दिला. आयपीएल २०२४ च्या दुसऱ्या सामन्यात पंजाब किंग्जने दिल्ली कॅपिटल्सचा पराभव करत विजयी सुरुवात केली. सॅम करनच्या ६३ धावांच्या शानदार अर्धशतकाच्या जोरावर पंजाब किंग्जने हा सामना ४ गडी राखून जिंकला. तसेच दुखापतीनंतर बऱ्याच कालावधीनंतर पुनरागमन करणारा ऋषभ पंत काही खास करु शकला नाही. एवढेच नाही तर कर्णधार पंतने या सामन्यात काही चुका केल्या ज्या कदाचित दिल्लीला महागात पडल्या.

### 900 बाऊंड्रीजचा टप्पा गाठला

या दरम्यान पंजाब किंग्जचा कर्णधार शिखर धवनने एक मोठा विक्रम केला. या सामन्यात पंजाबचा कर्णधार शिखर धवननेही संघासाठी सलामी दिली आणि ४ चौकारांच्या मदतीने २२ धावांची खेळी केली. या ४ चौकारांच्या जोरावर धवनने आयपीएलमध्ये इतिहास रचला.

धवनच्या नावावर ७५४ चौकार आणि १४८ षटकार आहेत, ज्यामुळे आयपीएलमध्ये त्याच्या बाउंड्रीजची संख्या ९०२ झाली आहे. लीगच्या १७ वर्षांच्या इतिहास इतर कोणत्याही फलंदाजाने चौकार आणि षटकारांसह ९०० बाउंड्रीजचा टप्पा गाठला नाही. त्यामुळे तो आयपीएलमध्ये ९०० बाउंड्रीज (चौकार षटकारांची संख्या) मारणारा पहिला फलंदाज ठरला आहे.